**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
**DEPARTMENT OF HISTORY**

**Dr. Babasaheb Ambedkar Bhawan, Pune – 411007, INDIA**

# जागतिक आणि भारतीय मध्ययुगीन इतिहासविषयक

# नोंदलेखन प्रशिक्षण कार्यशाळा

जागतिक आणि भारतातील मध्ययुगाशी संबंधित नोंदी विश्वकोशासाठी उत्तम प्रकारे लिहिता याव्यात यासाठी मराठी विश्वकोश मंडळाच्या अनुदानातून इच्छुक नोंदलेखकांची एक प्रशिक्षण कार्यशाळा दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित केली आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्याची इच्छा असेल तर खालील गूगल फॉर्मची लिंक वापरून आपली माहिती दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री ११-५९ वाजण्यापूर्वी कळवावी. निवड झाली असल्यास दि. १८ ऑगस्ट रोजी  मेलने कळवले जाईल.

मध्ययुगीन काळाबद्दल नोंद लिहायची इच्छा असणाऱ्या कोणत्याही विषयातील पदव्युत्तर पदवीधारकांना (मास्टर्स) अर्ज करता येईल. (उदा. सामाजिक शास्त्रे, साहित्य, भाषा, अभियांत्रिकी, स्थापत्य, वैद्यकशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र अशा कोणत्याही विषयांतील मध्ययुगीन घडामोडींवर नोंदी लिहायच्या आहेत.) कार्यशाळेतील प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विश्वकोशासाठी नोंदलेखक म्हणून आपण सहभागी होऊ शकाल.

**पात्र सहभागींना जास्तीत जास्त १००० रुपयांपर्यंतच्या प्रवासाच्या तिकिटांची प्रतिपूर्ती विद्यापीठ नियमांनुसार मागाहून केली जाईल. प्रवेशसंख्या मर्यादित आहे. कार्यशाळा मोफत आहे. संपूर्ण दिवसभर प्रशिक्षणात सहभाग घेणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल. निवासव्यवस्था उपलब्ध नाही.**

**स्थळ- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ इतिहास विभाग, पुणे.**

**दिवस- शनिवार २३ ऑगस्ट २०२५ वेळ- सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत.**

https://forms.gle/GVyS67E1updpCHpSA

Shraddha.

विभागप्रमुख